# लोकसत्ता

## Leading International Marathi News Daily

14 February 2014



ई-पेपर






होमिओपॅथी- मर्यादा व आव्हाने

SHARE

**डॉ. मंदार जोशी - रविवार ३० जानेवारी २०११**

drjoshimandar@gmail.com




२०१० साल हे होमिओपॅथी या औषधपद्धतीच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे ठरले. २०१०च्या सुरुवातीला अमेरिकेतील काही राज्यांनी या औषधांच्या विक्रीवर बंदी घातली तर काही राज्यांनी त्यांना फूड सप्लिमेंट या कॅटेगरीमध्ये टाकून त्यांचे महत्त्व कमी केले. इंग्लंडमध्ये तर हा विरोध फारच तीव्र झाला आणि ‘ब्रिटिश

मेडिकल असोसिएशन'ने होमिओपॅथी या औषधशास्त्राला २०१०च्या मे महिन्यात त्यांच्या 'नॅशनल हेल्थ सिस्टीम'मधून काढून टाकण्याच्या इराद्याने मोठी चळवळ उभी केली. त्यांच्यातील एक टॉम डॉल्फिन या उपसभापतीने तर या औषधपद्धतीला काहीच शास्त्रीय आधार नसल्याने ही औषधपद्धती म्हणजे चेटूक आहे, असे बिंबवण्याचा प्रयत्न केला. युरोपमधील जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, ग्रीससारख्या देशांमध्येही ही विरोधाची लाट थोडी पसरू लागली होती.

या विरोधाला काही होमिओपॅथीची प्रॅक्टिस करणारे अतिउत्साही डॉक्टरही जबाबदार आहेत. जगात आपली औषधपद्धतीच काय ती श्रेष्ठ आणि बाकी सर्व काही रुग्णांना अपायकारक आणि निरुपयोगी, या आवेशात 'आम्ही क्लिनिकमध्ये बसून हार्ट अ‍ॅटॅकपासून कुठलाही आजार पेशंटला हातही न लावता Dynamic Effect असलेल्या गोळ्या देऊन बरा करू शकतो,' अशी अवास्तव विधाने करणारे आणि एखाद्या असाध्य आजाराची एखादुसरी केस बरी करून अध्या हळकुंडाने पिवळे होणारे डॉक्टर याला जबाबदार आहेत.

एकीकडे भारताच्या वैदिक काळापासूनच्या अस्तित्वाचा आधार घेत आयुर्वेद आपले हातपाय जगभर पसरत आहे, लोकप्रिय होत आहे. तर दुसरीकडे होमिओपॅथी ही आपल्या औषधांमध्ये कुठल्याही मूलभूत औषधी घटकांच्या अस्तित्वाचा कणमात्रही अंश सिद्ध न करू शकल्याने 'प्लॅसिबो इफेक्ट' म्हणून हिणवली जात आहे. होमिओपॅथी डॉक्टरांनी आपली औषधपद्धती ही काही शास्त्रीय आधारांवर कशी सिद्ध करता येईल आणि कशी राजमान्य होईल, याच्या दृष्टीने प्रयत्न करणे जास्त गरजेचे होते. असा प्रयत्न मात्र फारसे कोणी करताना दिसले नाही. २००८ सालचे नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या डॉ. ल्यूक मॉंटेनर नावाच्या फ्रेंच शास्त्रज्ञाने जुलै २०१०मध्ये असा शोध लावला की, एका द्रावणात जर कुठल्याही AIDS सारख्या एखाद्या आजाराचे विषाणू किंवा जिवाणूंचे DNA असतील तर ते द्रावण एक प्रकारच्या हलक्या फ्रीक्वेन्सीच्या विद्युत चुंबकीय लहरी त्या पाण्यात सोडते. या हलक्या फ्रीक्वेन्सीच्या विद्युत चुंबकीय लहरींमुळे त्या द्रावणातील आजूबाजूच्या पाण्यातील अणुरेणूंची रचना एक प्रकारच्या 'सूक्ष्मादिसूक्ष्म संरचनेत' बदलते. (Nano Structures) या शास्त्रज्ञाने असेही संशोधन केले की, हे

## इतर

- लाइफ स्टाईल-मनोरंजन-कला
- Tech इट
- Drive इट
- Cut इट
- Style इट
- Trek इट
- साप्ताहिक राशिभविष्य
- शब्दकोडे
- नवनीत
- दिनदर्शिका

## उपक्रम

- 'एमपीएससी'चा राजमार्ग
- idea exchange

लोकसत्ता IDEA EXCHANGE सामर्थ्य संवादाचे

संघाने काँग्रेसलासुद्धा मदत केली आहे!


आजूबाजूचे उरलेले पाणीही मग अशाच प्रकारच्या हलक्या फ्रीक्वेन्सीच्या विद्युत चुंबकीय लहरी सोडते. यावरून त्यांनी असे अनुमान काढले की, एखादे द्रावण जर कितीही पाणी मिसळून अतिविरळ करण्यात आले की त्या द्रावणातील मूलभूत गोष्टींचे DNA जरी दिसू शकले नाहीत, तरीही हे पाणी त्या मूलभूत घटकांच्या सर्व गुणधर्मांचे अस्तित्व स्मरणात ठेवून त्या प्रकारच्या हलक्या फ्रीक्वेन्सीच्या विद्युत चुंबकीय लहरींच्या स्वरूपात दाखवू शकते.' डॉ. ल्यूक मॉँटेनर यांनी वापरलेला 'स्मरणात ठेवून' हा शब्द या ठिकाणी फार महत्त्वाचा आहे.

या सर्व संशोधनाचा सोप्या शब्दात अर्थ समजून घेतला पाहिजे. बऱ्याच वेळेला असे होते की, रुग्णाच्या काही आजारांचे निदान कुठल्याही परीक्षेने (जसे रक्तचाचणी, शरीरातील विविध द्रव्यांचे रासायनिक पृथक्करण, क्ष-किरण, एमआरआय) होत नाही, रुग्णाला त्या आजाराची लागण तर झालेली असते, पण अचूक निदान न झाल्याने त्यावरील ठोस उपाय करता येत नाहीत. त्यामुळे आम्हा डॉक्टरांना हे औषध देऊन बघ, त्या आजाराची उपाययोजना कर, असे प्रकार करावे लागतात. हल्ली बऱ्याचशा तापाच्या लक्षणांमध्ये हे प्रकर्षांने जाणवते. बऱ्याच केसमध्ये तापाचे निदान न होताच त्यावर औषध देऊन तो बरा केल्यासारखा वाटतो.

डॉ. ल्यूक मॉँटेनर यांच्या या शोधामुळे आता अशा विद्युत चुंबकीय लहरींचा अभ्यास करून आजाराची लक्षणे असूनही मानवी शरीरातील दडून बसलेल्या पण निदान न होणाऱ्या आजारांचे निदान होऊ शकेल व त्यावरील ठोस ट्रीटमेंट दिली जाऊ शकेल. हा शोध लावल्यानंतर डॉ. ल्यूक मॉँटेनर यांनी केलेले विधान याबाबतीत फार महत्त्वाचे आहे. २४ डिसेंबर २०१०ला 'सायन्स' या मासिकाला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की, होमिओपॅथी या शास्त्राबद्दल मला फार काही माहिती नाही, परंतु त्यांची 'हाय डायल्युशन्स'ची थिअरी माझ्या या संशोधनामुळे खरी ठरू शकते. एखाद्या अतिविरळ द्रावणातील मूलभूत घटकांचे अस्तित्व जरी नाहीसे झाले, तरीही त्या एका ठराविक आकाराच्या सूक्ष्म संरचनेतून त्या पाण्यात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवू शकतात आणि त्यांनी सोडलेल्या विद्युत चुंबकीय लहरींचा अभ्यास करून आपण ते सिद्ध करू शकतो.

२००८ साली त्यांना नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर त्यांनी होमिओपॅथीच्या अतिविरळ द्रावणांचा अभ्यास सुरू केला आणि जवळजवळ दोन वर्षांनी त्याबद्दलचे आपले मत ‘सायन्स’ या मासिकाला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केले. साहजिकच तोपर्यंत त्यांच्या या मताला युरोपमध्ये प्रचंड विरोध झाला. काहींनी त्याला बोगस म्हणून, तर काहींनी अशास्त्रीय म्हणून हिणवले. परंतु ते त्यांच्या मताला ठाम होते की, होमिओपॅथी औषधांमधील पोटेंटाइझ्ड अतिविरळ द्रावणात मूलभूत औषधी घटकांचा अवशेष असतो आणि त्यातील विद्युत चुंबकीय लहरींचा अभ्यास करून ते सिद्ध करता येईल. अर्थातच हा एक संशोधनाचा भाग आहे आणि त्यावर अजून खूप काम बाकी आहे. त्यांच्या या संशोधनाला फ्रान्स सरकारने मदत नाकारली. सध्या डॉ. ल्यूक मॉंटेनर त्यांच्या संपूर्ण टीमसह चीनमधील शांघाय शहरातील जीओन्टॉंग विद्यापीठात याच विषयावर संशोधन करीत आहेत.
साधारणपणे ऑक्टोबर २०१०च्या सुमारास मुंबई आयआयटीच्या संशोधकांचा याच विषयावरचा आणखी एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला. डॉ. जयेश बेल्लारे आणि त्यांचे विद्यार्थी प्रशांत चिक्रमाने यांनी मुंबईच्या आयआयटीमध्ये संशोधन करून असेच काही निष्कर्ष काढले की, होमिओपॅथीच्या पोटेन्सी असलेल्या साबुदाण्यासारख्या दिसणाऱ्या गोड गोळ्यांमध्ये ते औषध ज्या मूलभूत घटकांपासून केलेले असते त्यांचा अतिसूक्ष्म अंश असतो आणि ते सिद्ध करता येऊ शकते. हे संशोधन त्यांनीही नॅनो टेक्नोलॉजीच्या सिद्धांतानुसारच सिद्ध केले आहे. सोने, तांबे, लोखंड अशांपैकी एखाद्या खनिज धातूंपासून बनवलेल्या औषधाच्या गोळ्या त्यांनी शेजारील औषध दुकानातून आणल्या आणि त्याचे विरल द्रावण तयार केले. साधारणपणे २०० सेंटिसिमल या प्रमाणात विरल केलेल्या द्रावणातदेखील या शास्त्रज्ञांनी त्या धातूंच्या अस्तित्वाचे दाखले दिले आहेत. आजमितीला होमिओपॅथीच्या 30c, 200c यासारख्या औषधांपुढील अतिविरल केलेल्या औषधात मूळ घटक सापडतच नाही. त्यामुळे कुठल्याही वैज्ञानिक कसोटीत ही औषधपद्धती कधीही सप्रमाण सिद्ध होऊ शकत नाही.
या एका वैगुण्यामुळे ही औषधपद्धती नेहमीच टीकाकारांच्या बोचऱ्या टीकेला बळी पडत आहे आणि त्याविरोधात होमिओपॅथीची एकनिष्ठपणे


पर्यावरण हा अडथळा नव्हे, तर निकोप विकासाचा पाया

गाण्यातील ‘साऊण्ड’चा आनंद अनुभवता आला पाहिजे





माणसं बदलण्यापेक्षा धोरणं बदला!






सर्व काही अण्णांनीच करावे, असे लोकांना वाटणे हीच उणीव..





कांद्याचा भाव शंभर रूपये किलो का नको?





पीडीएतील दिवस

प्रॅक्टिस करणारे सतत मूग गिळून गप्प बसत असतो. कारण या सर्व आक्षेपांना, टीकांना उत्तरे देण्यासारखे कुठलेही वैज्ञानिक दाखले त्यांच्यापाशी नाहीत. या शास्त्राला भंपकपणा असे हिणवणाऱ्या लोकांच्या मताला का किंमत द्यावी, असाही एक प्रश्न आम्हा प्रत्येक डॉक्टरला नेहमी पडत असतो. आपल्या शास्त्रात काही त्रुटी आहेत, काही कमतरता आहे हे मान्य, तो एक संशोधनाचा भाग असू शकतो. पण ते शास्त्रच भंपक आहे, असे म्हणणे कितपत सयुक्तिक आहे?
डॉ. ल्यूक मॉंटेनर आणि आयआयटी मुंबईच्या शास्त्रज्ञांचे संशोधन आणखी एका दृष्टीने वरदान ठरले आणि ते म्हणजे होमिओपॅथीच्या औषधांचे क्वालिटी कंट्रोल. एखाद्या औषधात जर मूलभूत घटक सिद्धच करता येत नसेल तर त्यात भेसळ नक्की होऊ शकते. किरकोळ औषध व्यापारी ती बऱ्याचदा करतात. गिऱ्हाईक परत जाऊ नये किंवा मिळालेली ऑर्डर आपल्याजवळ औषधे नाही म्हणून परत जाऊ नये. याकरिता साध्या अल्कोहोलच्या बाटलीवर किंवा औषधी म्हणून टाकलेल्या साबुदाण्यांच्या गोळ्यांवर गिऱ्हाईकाला हव्या त्या औषधांचे लेबल लावून विकण्याचीही उदाहरणे मागील काही वर्षांत निदर्शनास आली होती. ही गोष्ट न्यायालयाच्या लक्षात आल्याबरोबर त्यांनी या प्रकरणात लक्ष घालून पोटेन्सी असलेल्या ४५० मि.ली. (एक पौंड)च्या बाटल्यांचे उत्पादन बंद करून १५० मि.ली.च्या छोटय़ा बाटल्यांच्या स्वरूपात करण्याचे आदेश औषधनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना देण्यात आले होते.
या सर्व हतबलतेसमोर आमच्याकडे एकच इलाज होता आणि आहे, तो म्हणजे हव्या असलेल्या औषधाच्या सीलबंद बाटल्या डायरेक्ट कंपनीकडून घेणे आणि हवे ते औषध साबुदाण्यासारख्या दिसणाऱ्या गोड गोळ्यांवर घालून देणे. हेच कारण आहे की, बहुतांश होमिओपॅथीचे डॉक्टर हे बाहेरून औषधे लिहून देण्यापेक्षा स्वत:कडची औषधे देणे पसंत करतात. आत्तापर्यंत तरी हा उपाय खात्रीलायक ठरत आहे. परंतु पुस्तकात वाचून किंवा कुणाच्या तरी सल्ल्याने केमिस्टकडे जाऊन 'ओव्हर द काऊंटर' औषधे घेणाऱ्यांचे काय? त्यांची फसगतच होऊ शकते. प्रत्येक औषधातील मूलभूत घटकांचे अस्तित्व सिद्ध करता आल्यानंतर प्रत्येक औषधी गोष्टींची आजारांकरिताची उपयुक्तता लक्षात

आणि अभिनयाचा श्रीगणेशा
------------------------



दुर्बलांना पोसणे म्हणजे सबलीकरण नव्हे!
------------------------



नक्कल करायलाही अक्कल लागते!
------------------------



मेधा पाटकर यांचे ऐकले असते, तर एकही पूल
झाला नसता!
------------------------




'नक्कल' न करणे हाच बाळासाहेबांचा खरा
वारसा
------------------------

आली की, आज जसे बऱ्याच बहुराष्ट्रीय औषध कंपन्या या आयुर्वेदिक डिव्हिजन उघडून त्याचे संशोधन आणि औषधनिर्मिती करीत आहेत, तसेच होमिओपॅथीबद्दलही होऊ शकते. तयारी हवी ती कुठल्याही नवीन संशोधनाचा मनापासून स्वीकार करण्याची.

केंद्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान खात्याच्या प्रोत्साहनातून एखादे कालनियोजित संशोधन सुरू केले जाऊ शकते. ते मूर्त स्वरूपात आल्यानंतर ज्या प्रत्येक औषधी गोष्टींचा उपयोग होमिओपॅथीने केला आहे (जसे वनस्पती, खनिज धातू, खनिज रसायने, क्षार, लवणे, लसीकरणातील जंतू, प्राणिजन्य वस्तू) यांच्या मूलभूत घटकांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म संरचनेचा किंवा हलक्या फ्रीक्वेन्सीच्या विद्युत चुंबकीय लहरींचा एक डेटाबेस तयार केला जाऊ शकतो. अशा या डेटाबेसचे संगणकीकरण करून प्रत्येक औषधनिर्मिती करणाऱ्या कंपनीला त्यानुसार ही प्रमाणित औषधे तयार करण्याचे बंधन घालता येऊ शकते. अर्थात याला प्रबळ राजकीय इच्छाशक्ती हवी. राजकारण्यांचे होमिओपॅथीचे प्रेम हे कॅपिटेशन फीच्या लालसेने मेडिकल कॉलेजेस चालू करण्यापुरते नसावे. सध्याचे मुख्यमंत्री हे विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे केंद्रीय मंत्री होते. त्यांनी या संशोधनांना मदत केली, तर याची संपूर्ण संशोधनात परिणती करून त्याचे पेटंट चीन किंवा फ्रान्सच्या अगोदर आपल्याला मिळवता येऊ शकेल.


पाच वर्षे प्रभावी सरकार देऊ शकेल अशी पर्यायी व्यवस्था मला दिसत नाही!
-----------------------


एक तळमळ बोलकी झाली
-----------------------


लोकांसाठी नव्हे , लोकांच्या सोबत...
-----------------------


एक गोष्ट आमच्याकडे शक्यतो होत नाही, ती म्हणजे ‘इलॉजिकल’ बोलणं किंवा वागणं!
-----------------------



[‘विचार’ निश्चित झाला की शब्द आपोआप सामोरे येतात]

-----------------------




[‘जमिनीचा पैसा बिल्डरांना नाही, तर सरकारला मिळायला हवा!’]

दि.०९-११-२०१२ रोजी
बाजार बंद झाला
त्यावेळचा भाव



निर्देशांक

डॉलर ५४.७५ | युरो ६९.६१

| | | |
|---|---|---|
| सोने | ₹ ३१,६२० | (+४२०) |
| चांदी | ₹ ६१,२४० | (+९५०) |
| निफ्टी | ५६८६.२५ | (-५२.५०) |
| सेन्सेक्स | १८६८३.६८ | (-१६२.५८) |



## Featured Services

- Astrology
- Express classifieds
- Express cricket
- Express hotels

## फोटो गॅलेरी

- गणेशोत्सव २०१२
- आजचे फोटो
- कार्टुन
- गणेश विसर्जन २०१२

१७ ऑगस्ट २००९ पुर्वीचे अंक

- Expressindia
- The Indian Express
- The Financial Express
- Screenindia
- Exims
- Sitemap
- Subscribe

Copyright © 2014 The indian express ltd. All Rights Reserved.

Loading...

Bookmark & Share
Select from these web-based feed readers:100zakladokAdifniAmazonArtoBaiduBit.lyBloggerBloggyBobrdobrDeliciousDiggDiggitaDraugiem.lvеKudosEmailEmail AppFacebookFavoritesFriendFeedGmailGoogleGoogle+HatenaJappy TickerLifestreamLinkedInLiveJournalMail.rumeinVZMen√©ameMessengerMister WongMyspaceNetLogNujijOKNOtizieOrkutOutlookOyylaPinterestPlurkPrintPushaRedditSettings...SonicostudiVZStumbleUponTuentiTumblrTwitterViadeoVKontakteWordPressWykopXINGY! BookmarksY! MailYorumcuyumMake sharing easier with AddThis for Internet Explorer.(email address)(email address)(optional) **Make sharing easier with AddThis for Internet Explorer.**

Don't show these
FacebookTwitterEmailPrintGmailStumbleUponFavoritesMore... (295)Settings...
Sign In
AddThisPrivacy